निशाणी क्र. ५१

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. १० चा सरतपासः–</u>**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – कृष्णाजी भानुदास सुर्यवंशी,

वय – ४५ वर्षे, व्यवसाय– शेती,

पत्ता – बोटकुळ, ता.निलंगा जि.लातूर.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एन. मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–</u>**

१. मी फिर्यादी व आरोपीस ओळखतो. फिर्यादी आणि आरोपी यांच्या मध्ये काय घडले होते हे मला माहित नाही.

२. **<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.</u>**

(आत्ता मला माझ्या फौ.प्र.सं. कलम १६१ नुसार नोंदविलेल्या जबाबातील अधोरेखांकीत भाग अ वाचवून दाखवण्यात आला.) त्या प्रमाणे मी पोलिसांना कांहिही सांगीतले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दि.०७/०३/२०२० रोजी दुपारी ३.०० च्या सुमारास श्रीमंत सुर्यवंशी यांना आरोपीने शिवीगाळ करून काठीने डोक्यात मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फिर्यादीला काठीने डोक्यावर, मानेवर, पाठीत, छातीवर मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, कमलबाई सुर्यवंशी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, हे भांडण मी, माझी पत्नी आणि शाम मुगळे यांनी सोडवले होते. आरोपी माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचे असल्याने त्यांना मदत करण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे अॅड. एम.आर.जगताप यांनी नाकारला.</u>**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृती,**

GUNJAVATE APARNA SHIVAJI

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक १३/०८/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, निलंगा.